## छोट्या जाहिराती

### साई गृह उद्योग

पेपर प्लेट व द्रोण मशिन घ्या सुरवातीला कमवा रुपये ९००० ते १५००० महिना कच्चा माल देणे व घेण्याची हमी संपर्क-साई गृहउद्योग, काळा मारोती रोड,अकोला. मो. न. ९८८१५५९९०६

....Cm 172/D. /Ex/4-3-14

### सर्व्हे करण्याकरीता 'पाहिजेत'

लोकसभा मतदार संघ उमेदवारी करीता अकोला अमरावती यवतमाळ + वाशिम व बुलढाणा येथील शेतकरी, अल्पभूधारकभूमीहीन शेतमजूर, व्यवसाईकपरंतू पदवीधर किवा उच्च 'शिक्षीत कोणत्याही जाती धर्माचा कोणत्याही पोलीस स्टेशन ला गुन्ह्याची नोंद नसलेला इच्छुकस्त्री-पुरुष उमेदवार पाहीजे त्वरीत खालील मो. क्रमांकावर संपर्क करा ९८५०३०८४३१ वेळ सकाळी १० ते संध्या ७ वाजेपर्यंत

..Cm.172 /D.5/Ex/17-02-14)

### भाड्याने पाहिजे

राऊतवाडी, आळशी प्लॉट, रणपिसे नगर, जवाहर नगर, रामदास पेठ, गोरक्षण रोड, यापैकी एका परिसरात २ बीएचके/३बीएचके सर्व सुविधायुक्त फ्लॅट अथवा स्वतंत्र घर खाजगी प्रतिष्ठानात उच्चपदस्थ व्यक्तीला भाड्याने पाहिजे.

संपर्क - ८४११०००२४६

(cm.179/Exp.20.2.14)


# मुंबईकर पद्मश्री डॉक्टरांचा गौरव




मानाचा पद्मश्री पुरस्कार मिळविलेले डॉ. मिलींद कीर्तने, डॉ. रमण देशपांडे आणि डॉ. शशांक जोशी यांचा एशिअन इन्स्टिट्यूट ऑफ ऑंकोलॉजीद्वारे सत्कार करण्यात आला. दि. २६ जोनवारी २०१४ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून ही नावे जाहीर करण्यात आली होती. या प्रख्यात डॉक्टरांना दिल्लीत एका शानदार सोहळ्यामध्ये राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्याहस्ते पद्मश्री पुरस्कार प्रदान केला जाईल.

डॉ. देशपांडे हे भारतातील एक विख्यात ऑंकोसर्जन आहेत शिवाय ते एशिअन इन्स्टिट्यूट ऑफ ऑंकोलॉजीचे कायंकारी अपाध्यक्ष असून ज्या तीन डॉक्टरांना त्यांच्या क्षेत्रातील परिश्रम आणि कार्यासाठी गौरवले जात आहे त्यांपैकी ते एक आहेत. त्यांनी जगविख्यात अशा ममोरिअल स्लोअन केटरींग कॅन्सर सेटरमध्ये प्रशिक्षण घेतले आणि टाटा मेमोरिअल हॉस्पीटलमध्ये १७ वर्षे काम केले. कॅन्सर या विषयावर वैद्यकीय संशोधन लेख आणि पुस्तके लिहिण्याव्यतिरिक्त टाटा मेमोरिअल हॉस्पीटलमध्ये थोरास्कोपिक सर्जरीचा अवलंब करणारे ते पहिलेच डॉक्टर आहेत. डॉ. मिलींद कीर्तने नाक, कान, घसा तज्ज्ञ असून ते हिंदुजा या खाजगी रूग्णालयात गेली अनेक दशके प्रॅक्टिस करत आहेत. त्यांच्या दीर्घ कारकीर्दीत त्यांनी सुमोर १६०० कर्णबधिर बालकांवर उपचार केले आणि त्यांना पूर्णपणे बरे केले. 'माझे काम कर्णबधिरांच्या कर्णावर्तीचे (कॉक्लिअर) पुनर्रोपण करण्यावर एकवटले होते. १९९५ पासून आमच्या टीमने संपूर्ण भारतातील केईएम, सायन व नायर हॉस्पीटलसारख्या सरकारी हॉस्पीटलमधील डॉक्टरांना असे पुनर्रोपण करण्यासाठी प्रशिक्षण दिले, ' असे डॉ. कीर्तने म्हणाले. ते पुढे असेही म्हणाले की, 'यामुळे सुमारे २० ते ३० लाख लोकांना फायदा होईल ज्यातील ९० टक्के ही बालके आहेत.'


**अर्थमाध्यम**

संकलन-संयोजन

सुबोध रणशेवरे

९८३३१४६३५६

subodh.ranshevre@rediffmail.com


## अक्षय पात्र फाऊंडेशन हॉल ऑफ फेममध्ये

अक्षय पात्र फाऊंडेशनला आयसीएआय (इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटन्स इन इंडिया) द्वारे गोल्ड शील्ड आणि हॉल ऑफ फेम पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. २०१२-१३ वर्षामध्ये कॅटगरी नॉट-फॉर-प्रॉफिट सेक्टर (ना-नफा विभाग)च्या अंतर्गत उत्कृष्ट वित्तीय रिर्पोटिंगकरिता फाऊंडेशनला हा सन्मान प्रदान करण्यात आला. माननीय मंत्री श्री. मनिष तिवारी, माहिती व प्रसारण केंद्रिय राज्य मंत्री आणि माननीय न्यायाधीश श्री. जी.एस. सिस्तानी, न्यायाधीश, दिल्ली उच्च न्यायालय यांनी ६ फेब्रुवारी २०१४ रोजी द पार्क, पार्लिमेंट स्ट्रीट, नवी दिल्लीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या समारंभामध्ये पुरस्कार वाटप केले. अक्षय पात्रने सलग पाचव्या वर्षी गोल्ड शील्ड जिंकले आहे आणि आता हा हॉल ऑफ फेममध्ये सामील आहे. हॉल ऑफ फेम अशा संस्थेला प्रदान केला जातो, जी समान श्रेणीमध्ये सलग पाच वर्षे गोल्ड शील्डची विजेता राहिली असेल. १९५८ मध्ये शुभारंभापासून आतापर्यंत केवळ दोन संस्थांनी हॉल ऑफ फेम जिंकले आहे आणि अक्षय पात्र नॉट-फॉर-प्रॉफिट सेक्टर (ना-नफा विभाग) मध्ये हॉल ऑफ फेम प्राप्त करणारी पहिली एनजीओ आहे.




## जगातील पहिले स्पर्शचलित 'लेचल' पादत्राण

आपण जगाच्या आणि आपल्या देशाच्या वाटचालीत काहीतरी योगदान द्यायलाच हवे,या प्रेरणेने झपाटलेल्या दोन हौशी उद्योजक आणि ड्युकेअर टेक्नॉलॉजीजचे संस्थापक किस्पिअन लॉरेन्स आणि अनिरूद्ध शर्मा यांच्या प्रयत्नांतून जगातील पहिलेवहिले इंटरॲक्टिव्ह स्पर्शचलित पादत्राण तयार झाले असून भारतात संशोधित झालेले हे तंत्रज्ञान सर्वांना वापरता येण्यासारखे आहे. ड्युकेअर टेक्नॉलॉजीजने 'लेचल' (नाव हिंदीतील 'ले चल' म्हणजे 'घेऊन चल'या संज्ञेपासून प्रेरीत आहे) या परिधानक्षम तंत्रज्ञानाच्या ब्रँडनावाअंतर्गत जगातील पहिलेवहिले इंटरॲक्टिव्ह स्पर्शचलित पादत्राण सादर केले आहे. एकापेक्षा एक अजबगजब उत्पादने सादर करून ग्राहकांना अनोखा अनुभव देऊच असा पैजेचा विडा या दोघा तंत्रज्ञानी उचलला आहे. तंत्रज्ञानाला ग्राहकासाठी कामाला लावण्याचे या दोघांचे धोरण असून त्यातून प्रत्येक वापरकर्त्याचे जीवनमान उंचावणारी,अडथळे न निर्माण करणारी,उत्स्फूर्त कार्यशैली उत्पादने निर्माण करणे हे त्यांचे ध्येय आहे. दृष्टिहीनांना विनाअडथळा प्रवास करता यावा यासाठी मुळात डिझाइन करण्यात आलेली ही पादत्राणे सर्वांसाठी उपयुक्त ठरु शकतील,हे या दोघांचे लक्षात आलेय या विचारातूनच पादत्राणांमधल्या थरथरीच्या साह्याने वापरकर्त्याला गंतव्यस्थळाकडे जायला मार्गदर्शन करणारी स्पर्शावर आधारलेली इंटरॲक्टिव्ह दिशादर्शक यंत्रणा बसवलेल्या स्टायलिश पादत्राणांची निर्मिती झाली. आता यापूढे थरथरणारी पादत्राणे बाजारपेठ काबीज करतील, असा त्यांना विश्वास आहे.




# व्होडाफोनची स्पोर्ट्स पोर्टलसाठी स्टार इंडियाशी भागीदारी!

भारतातील एक आघाडीची दूरसंचार कंपनी असलेली व्होडाफोन इंडिया लिमिटेड आणि देशातील आघाडीचा माध्यमसमूह असलेली स्टार इंडिया यांनी 'व्होडाफोन लाइव्ह'वर 'व्होडाफोन स्पोर्ट्स' हे विविध क्रीडाप्रकारांना वाहिलेले वैशिष्ट्यपूर्ण पोर्टल तयार करण्यासाठी धोरणात्मक हातमिळवणी करत असल्याची घोषणा आज केली.

आपल्या प्रकारच्या या पहिल्या आणि अनोख्या पोर्टलच्या साह्याने फीचर फोन आणि स्मार्टफोनच्या ग्राहकांना मैदानी, इनडोअर आणि ट्रॅकवरील सर्वोत्कृष्ट क्रीडाप्रकारांचा आस्वाद घेता येईल आणि ग्राहकांना कल्पकतेने पॅकेजिंग केलेले हे महत्त्वाचे आणि वैविध्यपूर्ण क्रीडा कार्यक्रम चालता-फिरताना कोठेही पाहता येतील.

व्होडाफोन स्पोर्ट्सद्वारे ग्राहकांना क्रिकेट, फुटबॉल, टेनिस, हॉकी, गोल्फ आणि मोटरस्पोर्ट यांसारख्या भारतात सर्वाधिक लोकप्रिय असलेल्या खेळांवर आधारलेल्या दर्जेदार आणि सखोल अशा लाइव्ह व पूर्वमुद्रित कार्यक्रमांचा आस्वाद घेता येईल.

'व्होडाफोन स्पोर्ट्स'ची सुरुवात क्रिकेट, फुटबॉल आणि हॉकी यांसारख्या खेळांबरोबर होत असून या पोर्टलवर एफ वन, टेनिस इ. अन्य महत्त्वाचे खेळही लवकरच दिसू लागतील.

# टाटाची पॉवर ऑफ ४९ मोहिम

टाटा ग्लोबल बेवरेजेसचा सामाजिक जागृती उपक्रम जागो रे व टाटा समूह यांनी संयुक्तपणे पॉवर ऑफ ४९ या मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात नुकतीच केली. तब्बल १०० दशलक्ष महिलांना जागृत करण्याच्या उद्देशाने चालवला जात असलेला हा उपक्रम म्हणजे हल्लीच्या काळात भारतात राबवल्या गेलेल्या सर्वांत मोठ्या महिला जागरूकता कार्यक्रमांपैकी एक बनावा या उद्देशाने हे महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. महिलांसाठीच्या पॉवर ऑफ ४९ या जागो रे उपक्रमाची सुरुवात ऑगस्ट २०१३ मध्ये करण्यात आली. भारतीय मतदारांमध्ये महिलांचे प्रमाण तब्बल ४९ टक्के आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या महिला मतदारांनी जाणकार व स्वतंत्र वृत्तीने मतदान करावे व येत्या निवडणुकांमध्ये आपल्या विचारांनुसार सरकार बनवण्याच्या किंवा सरकार पाडण्याच्या आपल्या शक्तीचा वापर करावा यासाठी महिलांना प्रोत्साहित करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. पॉवर ऑफ ४९ या उपक्रमामागची विचारधारा टाटा समूहाच्या सामाजिक धोरणांना अनुसरून असल्याने टाटा समूहानेही या उपक्रमाला भरघोस सहयोग दिला आहे. या मोहिमेत टाटा समूहातील कंपन्या व कर्मचारी स्वयंसेवकांच्या भूमिकेतून पुढे येऊन मोहिमेचा प्रभाव वाढविण्यासाठी हातभार लावतील.




## दहावीच्या बोर्डाच्या परीक्षांसाठी 'teacherni.com'

दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेचा अभ्यास करण्याच्या स्पर्धेत आपण मागे पडलो आहोत अशी भावना तुमच्या मनात निर्माण झाली असेल तर दु:खी होणे थांबवा आणि काम सुरू ठेवा. टीचरएनआय.कॉम हे भारतातील पहिले असे एज्युकेशन पोर्टल आहे, जे तुम्हाला तुमच्या बोर्डाच्या परीक्षांसाठी तयार करेल आणि तुमच्या स्वप्नातील गुण मिळवण्यासाठी सहकार्य करेल. अलीकडेच अनावरण झालेल्या या नवीन परीक्षा तयारी पोर्टलमधून भारतभरातील आयसीएसई आणि आयएससीच्या विद्यार्थ्यांच्या अतिरिक्त प्रशिक्षण आणि तयारीच्या गरजा पूर्ण केल्या जातात. कामगिरीवर आधारित उजळणी आणि चाचणी कार्यक्रम यांचे हे एकत्रीकरण आहे. तांत्रिकदृष्ट्या ऊर्जा मिळालेल्या अद्ययावत चाचणी तयारी वेबसाइटने खास चाचणी तयारी बुकलेट्सही तयार केले असून ते तुमच्या डोक्यावरून परीक्षेचे भूत उतरवण्यास सहकार्य करतील.

टीचरएनआय.कॉम ही एसॲण्डडी इमर्जिंग एंटरप्रायझेसची मालकीची कंपनी असून नवीन काळातील सुयोग्य शिक्षणातून एखाद्याला आपल्या घरात बसून त्याच्या हुशारीला चालना देण्याचे तिचे उद्दिष्ट आहे. टीचरएनआय.कॉम विशेषत: आयसीएसईच्या विद्यार्थ्यांना ज्यांना सोप्या आणि दर्जेदार अभ्यासाच्या साहित्याची तसेच नियमित चाचण्यांची सेवा देते. त्यांच्या सोप्या केलेल्या अभ्यासाच्या नोट्स, उजळणीसाठी बहुनिवड प्रश्नपत्रिका, ७२ अपेक्षित प्रश्नपत्रिका, उत्तरे तसेच गुणयोजनेसह- प्रत्येक विषयासाठी १२ पेपर्स, मोठ्या शाळांचे सोडवलेले प्रीलिम्सचे पेपर्स, गत २ वर्षांचे बोर्डाचे सोडवलेले पेपर्स आणि चाचणी तयारीची आपल्या मित्रांसोबत तुलना या सर्व गोष्टी त्यात आहेत. सध्या आयएसईच्या विद्यार्थ्यांना अपेक्षित प्रश्नपत्रिका आणि उत्तरे दिली जातात.

## महाशब्दकोडे 2430



**आडवी विधाने** :- 1) न बोलाविता आलेला 4) मराठी गीत रामायणाचे रचयिता, 9) श्रीरामचंद्राचा एक पुत्र 11) अपशकुन 12) काळ्या तोंडाचे माकड, 14) ग्रहणशक्ती, 16) द्रव्य, पैसा, 17) योग्य, रास्त, 18) प्रभू रामचंद्रांची वनवासात असतांना नाशकाजवळील या स्थळी काही काळ मुक्काम केला होता, 20) उत्कृष्ट प्रतीच्या लाकडाचा एक प्रकार, 21) श्रीरामचंद्रांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेले विदर्भातील एक प्रसिध्द तीर्थक्षेत्र, 23) पैसा, 24) वनवासात असतांना श्रीरामाची भेट भरताशी झाली तो क्षण, 27) एक प्रकाशमान किडा, 29) कर्म, कृत्य 31) फिरता भिक्षेकरी, फकीर, 33) कुठलेही कार्य पूर्ण झाल्यानंतर होणारा आनंद, तृप्ती, संतोष, 34) श्रीरामचंद्रांचा एक निस्सीम भक्त, 36) भरताला राज्य आणि वनवास मिळावा याकरीता, कैकयीचे कान भरणारी दासी, 37) दागिना, पर्वत, 39) निशा, रात्र, 40) रानावनात राहणे 42) आंग्लभाषेत जवळ, उत्तीर्ण, परवाना 45) रावण 47) मराठीत रामायणावर आधारित सुधीर फडकेंनी गायिलेले सुश्राव्य महाकाव्य, 49) प्रेम, निष्ठा, 50) औषधाची तीव्रता कमी करणारे औषध, 52) आपला देश 54) योजना, 56) रामायणात वर्णित एक गृध्र पक्षी, 57) प्रकृतिसिध्द बर्फ, 59) पाण्याचा मोठा साठा, 60) सहांचा समुदाय 62) एक शब्दालंकार, 65) खांब, रकाना 67) चावा, नांगी मारणे, 68) शुध्द, पवित्र, 69) रामायणात भरताची माता, 70) अलंकार, दागिना, 72) हस्तकौशल्य, सहजता, 74) अर्धा भाग, सैन्य, 75) मदिरा, दारू, 76) आदर करण्यास पात्र

**उभी विधाने** :-1) अकबरपुत्र सलीमची प्रेयसी 2) रंगमंचावर सादर करण्यात येणारे कथानक 3) पोळी शेकण्याचे पात्र 4) निकड, आवश्यकता, 5) महिना, 6) कोलकत्याचे एक विमानतळ, 7) रहस्य, 8) शरीर रक्षणासाठी असलेला चिलखत 10) आणीबाणीच्या परिस्थितीत केंद्र शासनाने सर्व जनतेला लागू होईल असा काढलेला अध्यादेश, 13) नवीनच आलेला 15) उद्यान, उपवन, 18) चिखलात उमलणारे एक फुल, 19) कच्चे रेशिम धुतांना निघून जाणारा गाळसाळ, 20) उंट हाकणारा 22) आधार, दुजोरा, पुष्टी, 25) भिन्नत्वाची बुध्दी, 26) उपहास, फजिती, 28) जेथे सगळेच अडाणी तेथे थोडासा शहाणा मोठा योग्यतेचा समजला जातो, या अर्थाची एक म्हण, 29) अरण्य, जंगल, 30) धाकटा भाऊ, 32) गतिशील, वेगाने जाणारा, 34) जबरदस्तीने नेणे, लुटणे, 35) अहंकारी, अभिमानी 38) हत्ती 41) रोग, आजार 42) पारद 43) संन्याशाचे प्राणोत्क्रमण झाले त्या ठिकाणी बांधलेले स्मारक, थडगे 44) ज्याच्या नाकातून ओझरता उच्चार निघतो तो वर्ण, 46) मोठे नगर 47) भगवत् गुणानुवाद करणारा बोधपर ग्रंथ 48) निपुण, निष्णात, 50) लक्ष्मणाची पत्नी, 51) अमृत, 53) शाप, संताप, 55) मोठे तळे, 56) विजयाचे स्मारक म्हणून रोवलेला खांब, 58) विदेशी मद्य, 61) गाडीचे आच्छादन, 63) परीक्षा, कस लावण्याचा दगड, 64) एखाद्याचे हुबेहूब अनुकरण, 66) उणीव भरून काढण्याची गोष्ट, पोषण, 69) तुरूंगवास, अटक 70) प्रथम, पूर्वीचा, 71) काढून टाकलेला, 73) पाणी (सं.) ●

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर



anumeya - 8446302691

## जागतिक अग्रगण्य पुरवठादार सोफोजने सायबरोम विकत घेतली

इलिटकोअर टेक्नॉलॉजीस् प्रायव्हेट लिमिटेडची स्पिनऑफ आणि कारलायल ग्रुपद्वारे अनुदानित सायबरोम टेक्नॉलॉजीस् प्रायव्हेट लिमिटेडने आज घोषणा केली की, परिपूर्ण आयटी सिक्युरिटी सोल्यूशन्सची जागतिक अग्रगण्य पुरवठादार सोफोजने सायबरोम विकत घेतली आहे.

मूळची अहमदाबाद, भारत येथील असलेल्या या कंपनीने बाजारापेक्षाही अधिक वेगाने सातत्यपूर्वक विकास करून घेतला आहे आणि ग्लोबल नेटवर्क सिक्युरीटी मार्केटमध्ये कॉस्ट लीडरशिप व ऑपरेशनल एफिशिएन्सी फायदे प्राप्त केले आहेत. हेमल पटेल, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, सायबरोम टेक्नॉलॉजीस् म्हणाले, ''सायबरोम एक उत्तम उदाहरण आहे, जे सिलिकॉन व्हॅलीमध्ये सर्वच यशस्वी तंत्रज्ञान उत्पादन नाविन्यतेतच नव्हे; योग्य संचालन आणि योग्य ध्येयासह हे कुठेही घडू शकते. जागतिक आयटी उत्पादन कंपनीच्या रुपात सायबरोमला घडवण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत जी उत्तम उत्पादन क्षमता, टीम क्षमता आणि अनोख्या अभिनव क्षमतांचे प्रदर्शन करते. वेगाने विकसित होणाऱ्या नेटवर्क सिक्युरिटी मार्केटमधील अनेक मार्गांमध्ये सायबरोम आणि सोफोज एकमेकांना पूरक आहेत. एकत्रित शक्ती आम्हाला आमचे ग्राहक आणि चॅनेल भागीदारांना अधिक उत्पादन नाविन्यता व मूल्य सादर करण्यास परवानगी देईल.''



# देना बँकेच्या व्यवसायात १,६५,९७६ करोडची वृद्धी

ग्राहकांच्या विश्वासार्हता लाभलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील मानांकित देना बँकेच्या कार्यकारी संचालक मंडळाने नुकतेच एका पत्रकार परिषदेद्वारे चालू आर्थिक वर्षातील तिसऱ्या तिमाहीचे आर्थिक निकाल घोषित केले. देना बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष श्री. अश्विनी कुमार यांनी हे आर्थिक निकाल घोषित केले. या निकालांनुसार या तिमाहीत देना बँकेचा व्यवसाय १,६५,९७६ इतका वाढला आहे. तर बँकेच्या एकूण ठेवींमध्ये १३.१९ टक्क्यांनी वाढ होऊन या ठेवी ९६, ०८१ करोड इतक्या वाढलेल्या आहेत. बँकेचे एकूण उत्पन्न २,६६२,०८० करोड इतके दर्शविले गेले असून व्याजावरील उत्पन्नात ११.८२ टक्क्यांनी वाढ होऊन हे उत्पन्न २,६९८८ करोड इतके वाढले आहे. व्याजविरहित उत्पन्न १२८.९६ करोड आहे निव्वळ व्याजाची मर्यादा २.६६ टक्के इतकी दर्शविली गेली आहे. तर बँकेचा प्रति कर्मचारी नफा २.११ लाख तर प्रति शाखा नफा १८.७० लाख इतका झाला आहे. चालू सत्रात बँकेने देशभरात २४ नव्या शाखांचा शुभारंभ केलेला आहे. चालू सत्रात बँकेचा निव्वळ नफा ३६४.३८ करोड इतका आहे तर अनुत्पादित नफा १३२६.३३ करोड इतका वाढला आहे. एकूणच देना बँकेचा व्यवसाय हा चढत्या आलेखाचा आहे.

## राशीभविष्य

रविवार दि. १६-२-२०१४

आजचे शुभांक २, ३, ६

दिनविशेष

**मेष** - मन:स्थिती अतिशय सैरभैर राहील. विवाहयोग येतील लहान मुलांना जपा.

**मिथुन** - मन:स्थिती अतिशय सैरभैर राहील.मानसिक, शारीरिक आणि आर्थिक पथ्ये पाळाच.

**सिंह** - विवाहयोग, नोकरीचा लाभ, विशिष्ट गुंतवणुकीतून लाभ इ. गोष्टीचा दिवस.

**तुळ** - मानसिक अशांतता राहील. नोकरीत खटके उडतील. कलाकरमणुकीतून आनंद.

**धनु** - स्त्रीमुळे लाभ. तरुणांना परदेशगमनाच्या संधी येतील. कामगारपीडा सतावेल.

**कुंभ** - वैयक्तिक यशाची पार्श्वभूमी ठेवतील. मुलाखती यशस्वी होतील.

**वृषभ** - जनसंपर्कातून उत्तम. रसिकांचा सहवास लाभेल. गाठीभेटी होती.

**कर्क** - गाठीभेटी, तसेच उत्सवसमारंभ इ. तून अपवादात्मक गोष्टींतून अडथळे येऊ शकतात.

**कन्या** - वादग्रस्त, तसेच रोगव्याधिग्रस्त मंडळींना संवेदनशील असाच दिवस.

**वृश्चिक** - तरुणांना मोठे यश मिळेल. मोठे सांपत्तिक उत्कर्ष जीवन समृद्ध बनवतील.

**मकर** - गुंतवणुकीतून मोठे लाभ नोकरीतील पार्श्वभूमीवर विलक्षण असा शुभ दिवस.

**मीन** - सतत संतापण्याचे प्रसंग येतील. नवपरिणीतांनी सांभाळावे. विशिष्ट वादविवाद झोंबतील.